बुधवार दिनांक २७/०१/२०१६ रोजी सकाळी ०१.०० वाजता बांधकाम समिती सभागृह जि.प.सातारा येथे झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत

| सभेची तारीख व वेळ | उपस्थित असलेल्या सभासदाची नावे | |
|---|---|---|
| बुधवार दिनांक २७/०१/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता | १) मा.श्री.साळुंखे प्रदीप उर्फ रवि सुर्यकांत | सभापती |
| | २) मा.श्री.भोसले राजू अनिल | सदस्य |
| | ३) मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र | सदस्या |
| | ४) मा.श्री.कदम राहूल बबनराव | सदस्य |
| | ५) मा.श्री.पवार शशिकात निवृत्ती | सदस्य |
| | ६) मा.श्री.जाधव सदाशिव यशवंत | सदस्य |
| | ७) मा.सौ.घाडगे सावित्रा मानाजी | सदस्या |
| | ८) मा.सौ.शिंदे राधाबाई दिनकर | सदस्या |
| | ९) मा.श्री.जयवंत दिनकर जगताप | सदस्य |

सर्व संबधितांचे उपस्थितीमध्ये मा.सभापती बांधकाम समिती जिल्हा परिषद सातारा यांचे परवानगीने सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

विषय क्रं.१ :- दिनांक ३०.१२.२०१५ रोजी झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव क्रं.२२८ :- दिनांक ३०.१२.२०१५ रोजी झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणेत आला.

सूचक :- मा.जाधव सदाशिव यशवंत
अनुमोदकः- मा.सौ.शिंदे राधाबाई दिनकर

**ठराव सर्वानुमते मंजूर**

विषय क्रं.२ :- विविध योजनांच्या कामांचा तालुकानिहाय आढावा घेणे.

ठराव क्रं. २२९ :- विविध योजनेच्या कामांचा तालुकानिहाय आढावा घेणेत आला. तसेच कामे मुदतीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने उप अभियंता यांना आवश्यक त्या सूचना देणेत आल्या.

सूचक :- मा.श्री.पवार शशीकांत निवृत्ती
अनुमोदक :- मा.श्री.कदम राहुल बबनराव

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रं.३ :- सातारा जिल्हा परिषदेकडिल बांधकाम विभाग उत्तर व दक्षिण कडील लेखा विषयक नोंदवहया दिनांक ऑक्टोबर २०१५ ते डिसेंबर २०१५ अखेर अदयावत व परिपुर्ण असले बाबत अवलोकन करणे.

ठराव क्रं. २३०:- बांधकाम विभागा कडिल ठेवण्यात आलेल्या लेखा विषयक नोंदवहया खालीलप्रमाणे दिनांक ऑक्टोबर २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५ अखेर अदयावत व परिपुर्ण ठेवलेल्या आहेत. शासनाकडिल परिपत्रक क्रमांक पंरास १०८८/४८०/२७ दिनांक ११/१/१९७९ नुसार सदर नोंदवहयाचे अवलोकन करण्यात येवुन त्यास ही सभा मंजुरी देत आहे.

१. रोकड नोंदवही नमुना नं.४
२. प्राप्त धनादेश नोंदवही नमुना नंबर ११

३. प्रदानार्थ मिळालेल्या देयकांची नोंदवही नमुना नंबर १२
४. योजनेच्या प्रगतीची नोंदवही नमुना नंबर २३
५. स्थावर मालमत्ता नोंदवही नमुना नंबर ३९
६. रस्त्याची नोंदवही नमुना नंबर ४०
७. योजनेच्या कामांची नोंदवही नमुना नंबर ४२
८. नाववार हजेरीपत्रक हजेरीपत्रक नोंदवही नमुना नंबर ४६
९. करारबध्द ठेकेदारांची नोंदवही नमुना नंबर ४८
१०. मोजमाप पुस्तकाची नोंदवही नमुना नंबर ५३
११. निलंबन नोंदवही नमुना नंबर ७९
१२. मंजुर अंदाजपत्रक नोंदवही नमुना नंबर ८५
१३. दुरध्वनी नोंदवही नमुना नंबर ९१

सूचक :- मा.श्री.जाधव सदाशिव यशवंत
अनुमोदक :- मा.सौ.शिंदे राधाबाई दिनकर

**ठराव सर्वानुमते मंजूर**

ऐनवेळचा वि.क्रमांक ४:- सातारा जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये सदस्यांचे नावाचा फलक बसविणेस मान्यता मिळणे बाबत.

ठराव क्रमांक २३१ :- सातारा जिल्हा परिषदेच्या आवारात यशवंतराव चव्हाण सभागृहाचे बांधकाम पुर्ण होत आलेले आहे. सदर सभागृहाच्या प्रवेशव्दाराजवळ सातारा जि.प.च्या सन २०१२-१७ या कालावधीतील नांव,गांव,तालुका असलेला असा फलक जिल्हा परिषदेच्या दैनंदिनी मधील क्रमवारी प्रमाणे लावणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सूचक :- मा.श्री.जगताप जयवंत दिनकर
अनुमोदक :- मा.श्री.पवार शशीकांत निवृत्ती

**ठराव सर्वानुमते मंजूर**

येणेप्रमाणे विचार विनिमय झालेनंतर मा.जि.प.सदस्य,श्री.पवार शशीकांत निवृत्ती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व सभा संपलेचे जाहिर केले.

**सही/XXX**
सभापती
बांधकाम समिती जि.प.सातारा

**सही/XXX**
सचिव
बांधकाम समिती जि.प.सातारा

खरी नक्कल

सचिव
बांधकाम समिती जि.प.सातारा